बिना सहकार नही उध्दार !

# Archana Nagar Co.Op. Hsg. Society Ltd.

39/2/2, Erandwane, Pune - 411038.
Reg. No. P.N.A./H.S.G./(T.C.)/1707/1989-90 Dt. 27/10/1989
Email : archananagar.chs @gmail.com

Ref. No. 2024-25/35

Date : 21.2.25

**दिनांक 20 फेब्रुवारी 2025 रोजी कार्यकारणी समिती व पुनर्विकास समितीच्या संयुक्त बैठकीचा इतिवृत्तांत**

दिनांक 20 फेब्रुवारी 2025 रोजी संस्थेची कार्यकारणी समिती व पुनर्विकास समिती यांची संस्थेच्या कार्यालयात सायंकाळी ६.३० वाजता संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस उपस्थित सदस्यांची यादी सोबत सहपत्रित केली आहे.

बैठकीच्या अजेंडा नुसार सुरुवातीस पुनर्विकास कामाबाबत झालेल्या प्रगतीचा आढावा संस्थेच्या अध्यक्षांनी सर्व सभासदांना सांगितला.

संस्थेच्या संयुक्त समितीने व पी एम सी ने शॉर्टलिस्ट केलेल्या तीन विकसकांच्या नावाचा तपशील यापूर्वीच्या इतिवृत्तांतात स्पष्ट केला आहे. तसेच, शॉर्टलिस्ट केलेल्या तीन विकसकांना दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत दूरध्वनीद्वारे अध्यक्ष महोदयांनी कळविले होते. तसेच, पीएमसीने त्यांना याबाबत ई-मेल द्वारे कळविले होते. त्यापैकी रुही मंगलम व डी अँड टी प्रॉपर्टीज यांनी स्वीकृतीबाबत कळविले आहे. तथापि, संचेती स्पेसेस यांनी त्यांना स्वीकृती शक्य नसल्याने माघार घेत असल्याचा ई-मेल पाठविला आहे, याबाबत सभागृहास अवगत करण्यात आले. याविषयी दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली असून तोपर्यंत संबंधितांनी फेरविचार करून कळवल्यास त्यांचा विचार करता येईल, असे ठरले. या कालमर्यादेत त्यांनी काहीही न कळल्यास दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या सभेत ठरल्यानुसार त्यांचा निर्णय दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी पुनर्विकास कार्याच्या प्रगतीचा तपशील सर्व सदस्यांना अवगत करण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत सर्वांना कळविण्यात येईल व उर्वरित दोन विकासकांकडून पुढील कार्यवाही करण्याचे ठरले.

शॉर्टलिस्ट केलेल्या ३ विकसकांपैकी ज्यांनी स्वारस्य दाखविले आहे त्यांच्या साईटना संस्थेच्या सर्व सभासदांना भेटी देण्याच्या दृष्टीने दिनांक ९ मार्च २०२५ रोजी रुही मंगलम व दिनांक १६ मार्च २०२५ रोजी डी अँड टी प्रॉपर्टीज यांच्या साइट्सना सर्व सभासदांच्या भेटी आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले.

पुनर्विकासाचे कामाच्या दृष्टीने विकसक अंतिम करण्यासाठी दिनांक २३ मार्च २०२५ रोजी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात येईल. दिनांक 23 मार्च 2025 च्या संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे स्थळ व वेळ ही नंतर परिपत्रकाद्वारे घोषित करण्यात येई. या सभेत पुनर्विकासाच्या कामासाठी स्वारस्य दाखविलेल्या

अर्चनानगर गृहरचना संस्था मर्यादित
रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९० पुणे-४११०३८

विकसकांना त्यांचे सादरीकरण करण्याची संधी देण्यात येईल. सादरीकरणात संबंधितांनी त्यांच्या संस्थेची माहिती येण्यावर भर न देता संस्थेच्या विकासाबद्दल त्यांचे काय नियोजन आहे याचे सादरीकरण करण्याबाबत त्यांना कळविण्यात येईल. प्रत्येक विकसकाचे सादरीकरण अंदाजें ३० ते ४० मिनिटाचे राहील व त्यानंतर तेवढाच वेळ प्रश्नोत्तरांसाठी देण्यात येईल.

त्यानंतर विकासाच्या अंतिम निवडीसाठी खुल्या पद्धतीने मतदान घेण्यात येईल. संस्थेच्या जास्तीत जास्त सदस्यांनी या सभेत उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावावा यासाठी बिल्डिंग प्रतिनिधींनी त्यांचे बिल्डिंगमध्ये सर्वांपर्यंत माहिती पोहोचवावी. संस्थेच्या प्रत्येक नोंदणीकृत सदस्याचे दोन प्रतिनिधी (ज्यापैकी किमान एक सदस्य किंवा सह सदस्य किंवा सहयोगी सदस्य असेल) या सभेस उपस्थित राहू शकतील, याची सर्वांनी नोंद/दक्षता घ्यावी.

याप्रकरणी कायदेशीर बाजू समजावून घेण्याच्या दृष्टीने प्रकल्प व्यवस्थापन समितीच्या (पीएमसी) कायदेशीर सल्लागारांना उपस्थित राहण्याचे सुचवण्यात येईल. त्यांच्याकडून मतदान प्रक्रियेची कायदेशीर बाजू व पुनर्विकास प्रक्रियेची कायदेशीर बाजू सर्व सदस्यांना सांगण्यात येईल, असे ठरले.

सदर सभेस खालील कार्यकारणी सदस्य व पुनर्विकास समिती सदस्य उपस्थित होते

| | | |
|---|---|---|
| १) | श्री प्रशांत भोसले | अध्यक्ष |
| २) | श्री अमित पाटील | सचिव |
| ३) | श्री मनोज कचरे | खजिनदार |
| ४) | सौ रेखा मोरे | कार्यकारणी सदस्य |
| ५) | श्री सुनील उप्पाध्ये | कार्यकारणी सदस्य |
| ६) | श्री किशोर सावजी | कार्यकारणी सदस्य |
| ७) | श्री अशोककुमार रावराणे | कार्यकारणी सदस्य |
| ८) | सौ मेघना रानडे | कार्यकारणी सदस्य |
| ९) | श्री प्रसाद वैद्य | पुनर्विकास समिती- अध्यक्ष |
| १०) | श्री मोहनराव देशमुख | पुनर्विकास समिती- अध्यक्ष |
| ११) | श्री माधव कुलकर्णी | पुनर्विकास समिती- सदस्य |
| १२) | श्री धनंजय रानडे | पुनर्विकास समिती- सदस्य |
| १३) | श्री प्रदीप घोडके | पुनर्विकास समिती- सदस्य |
| १४) | श्री आशिष कुलकर्णी | पुनर्विकास समिती- सदस्य |
| १५) | श्री मंगेश गोखले | पुनर्विकास समिती- सदस्य |

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित

सचिव

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९०
पुणे-४११०३८

website - archananagarchs.co.in